# गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने बुलडाणा नागरी सहकारी बँकेत सुरू केली 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा

**अत्यंत अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना त्यांच्या सोयीनुसार आपला ऐवज सुरक्षितपणे उपलब्ध होईल**

मुंबई, : वर्षे जुन्या गोदरेज समूहाची एक भाग असलेली आणि सुरक्षितताविषयक सोल्युशन्स पुरविणारी भारतातील प्रसिद्ध कंपनी गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने आज बँकिंग सुरक्षिततेला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत 'ऑटोव्हॉल्ट' सुविधा उपलब्ध केली आहे. माननीय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी रस्ते वाहतूक मंत्री यांच्या उपस्थितीत शिवाजी पार्क येथे बुलडाणा नागरी सहकारी क्रेडिट सोसायटी लि.च्या उद्घाटन सोहळ्यात 'ऑटोव्हॉल्ट' या स्वयंचलित सेफ डिपॉझिट लॉकरचा शुभारंभ करण्यात आला.

बहुस्तरीय सुरक्षा प्रणालीने सज्ज असलेल्या ऑटोव्हॉल्टमुळे ग्राहकांना कोणत्याही त्रासाविना तसेच कर्मचाऱ्यांच्या हस्तक्षेपाविना आपला मौल्यवान ऐवज कोणत्याही वेळी उपलब्ध होऊ शकेल. याशिवया, या उपाययोजनेमुळे ग्राहकाला रुममध्ये पूर्णपणे गोपनीयता राखली जाईल. आपले स्मार्ट/ ॲक्सेस कार्ड स्वाईप केल्यावर त्याला/ तिला लॉकर रुमपर्यंत पोहोचता येईल.

अशा प्रकारचे पहिलेच लॉकर असलेल 'ऑटोव्हॉल्ट' हे 'डिजिटल इंडिया' अभिनयाच्या दृष्टीने उत्तम उदाहरण ठरेल.

मळलेली पायवाट सोडून नवीन काहीतरी शोधण्याचा प्रयत्न कायमच गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्स करत असल्याने सुरक्षिततेच्या बाबतीत सातत्याने नव्या तंत्रज्ञानाचाच अवलंब करण्यात आला आहे. 'ऑटोव्हॉल्ट' देखील अशीच अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्था असून त्याने बँकिंग सुरक्षिततेला नवे आयाम दिले आहेत. या अत्याधुनिक यंत्रणेबाबत गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सचे उपाध्यक्ष आणि गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सच्या मार्केटिंग, सेल्स आणि इनोव्हेशनचे ग्लोबल हेड श्री. मेहेर्नोश पिथावाला यांनी सांगितले की, 'नाविन्यता हा मूळ गाभा कायम राखत गोदरेज सिक्युरिटी सोल्युशन्सने ग्राहकांना चांगला अनुभव मिळावा, यावर कायमच भर दिला आहे. 'ऑटोव्हॉल्ट'मुळे केवळ बँकिंग सुरक्षाविषयक पायाभूत सुविधा बळकट होणार नाही तर, त्यांच्या ग्राहकांना देखील व्यवहार करणे अतिशय सुलभ होणार आहे.'

'या डिजिटल युगात, कमालीची सुरक्षितता उपलब्ध करू शकेल असे तंत्रज्ञान पुरविणे हे अतिशय महत्त्वाचे ठरते. बुलडाणासारख्या बँकेने देशभरातील वित्तीय संस्थांसाठी एक उदाहरण सादर केले आहे, याचा आम्हाला आनंद होत आहे.'

बुलडाणा सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शिरीष देशपांडे म्हणाले की, ''ऑटोव्हॉल्ट'' सुविधेचा शुभारंभ आणि आमच्या नव्या शाखेचे उद्घाटन करण्याबरोबरच आमच्या आणखी पाच शाखांमध्ये या अत्याधुनिक तंत्रज्ञाचा समावेश करून ग्राहकांचे लक्ष्य साध्य करण्याचा आमचा प्रयत्न राहील.'

याप्रसंगी इटोकी कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्री. हिरोशी जिझा यांनी सांगितले की, 'गोदरेजचे भागीदार असणे, ही इटोकीसाठी आनंददायी बाब आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या 'ऑटोव्हॉल्ट' मुळे बँकेला आपल्या ग्राहकांना एक आल्हाददायक अनुभव देता येईल.'